# प्रेस नोट

**दि. ०९/०८/२०१९ रोजीचा खाजगी सुरक्षा रक्षक सहभाग कार्यप्रणाली (P4) बैठक**

पुणे पोलीस आयुक्तालयातर्फे दि.१८/०३/२०१९ रोजी पासुन खाजगी सुरक्षा रक्षक सहभाग कार्यप्रणाली (P4) कार्यान्वीत केलेल्या प्रणालीबाबत **मा. के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर** यांचे मार्गदर्शनाखाली बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस **मा. के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर** यांचेसह खालील अधिकारी उपस्थित होते.

१) मा. डॉ.रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,
२) मा.श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे शहर
३) मा. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन, पुणे शहर
४) मा. श्री. बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, गुन्हेशाखा, पुणे शहर
५) मा.डॉ. शिवाजी पवार, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा, पुणे शहर

तसेच, पुणे शहरात कार्यरत असलेल्या **खाजगी सुरक्षा रक्षक चालक - मालक एकुण २११ सदस्य** व आम्ही स्वतः नोडल अधिकारी म्हणून उपस्थित होतो. सदर बैठकी करीता उपस्थित एजन्सी मालक – चालक यांचे **स्वागत व प्रस्तावना पो.नि. अजित लकडे, नोडल अधिकारी, खाजगी सुरक्षा रक्षक सहभाग कार्यप्रणाली यांनी केली.**

**मा. श्री.अशोक मोराळे , अपर पोलीस आयुक्त, गुन्हेशाखा, पुणे शहर** यांनी उपस्थित सदस्य यांनी खाजगी सुरक्षा रक्षक सहभाग कार्यप्रणालीचे उद्देशबाबत पी.पी.टी. व्दारे माहिती दिली. त्यानंतर सदर बैठकीमध्ये उपस्थित खाजगी सुरक्षा रक्षक यांनी खालील समस्या मांडल्या.

सदर बैठकीमध्ये खाजगी सुरक्षा रक्षक यांनी मांडलेल्या समस्यांवर खालील अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

**मा. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन पुणे शहर** यांनी सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

१)सर्व खाजगी सुरक्षा एजन्सी यांनी गार्डसूची अद्यावत माहिती वेळोवेळी संबंधीत पोलीस ठाणेस दयावी.
२) विनापरवाना कार्यरत असलेल्या एजन्सीची माहिती दयावी.
३) ज्यासोसायटीमध्ये गाडी सोडण्यासाठी गेट आहे. ते बंद असावे, गेटमधून येणा-या सर्व माणसांची चौकशी करावी.
४) सोसायटी मधील संशयति हालचाली, नवीन वस्तू यांची माहिती पोलीसांना कळवावी.
५) बीट मार्शल यांचेशी समन्वय ठेवावा अशा सुचना दिलेल्या आहेत.

**मा. डॉ. रविंद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** यांनी खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी गार्डस् यांची चारित्र्य पडताळणी ही सुरक्षेची बाब असल्याने पसारा कायदा नियमावलीप्रमाणेचे कामकाज चालणार असलेबाबत सांगितले. शहरातील वाढती गुन्हेगारी रोखण्याकरीता सहकार्याने काम सुरु करु असे सांगितले.

**मा. के.व्यंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे शहर** यांनी बैठकीमध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले.

१) विना परवाना एजन्सीवर पसारा कायदयान्वये कार्यवाही करण्यात येईल.
२) पोलीस आणि खाजगी सुरक्षा एजन्सी यांनी सहकार्यने काम केल्यास गुन्हे प्रतिबंध होण्यास मदत होईल.
३) ज्या सोसायटीमध्ये कार्यरत आहे. तेथील परिसर सुरक्षित ठेवावा.
४) ज्या एजन्सी ला सोसायटीच्या ठिकाणी जास्त गार्ड नेमता येत नाही . त्यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसव्यावेत.
५) ज्या ठिकाणी परवानाकरीता एजन्सीकडून पैशांची मागणी होत असलेबाबत तक्रारी दयावेत.

६) सर्व एजन्सी मालक चालक यांना १०० नंबर व व्हॉटस्ॲप नंबर ८९७५२८३१०० या नंबर कोणताही तक्रार अथवा महिती देणेबाबत सांगितले. तसेच सदरचे नंबर सर्व गार्डस् देणेबाबत सुचित केले.

७) गणपती बंदोबस्त कालावधीमध्ये आवश्यकता असल्यास सुरक्षा रक्षकांची मागणी करण्यात येईल.

८) ज्या गार्डस् ने गुन्हे उघडकीस येणकरीता मदत किंवा माहिती दिलेली असेल त्यांचे एजन्सीव्दारे सन्मान करण्यात येईल.

९) विनापरवाना एजन्सी यांनी रजिस्टेशन करावे.

१०) सुरक्षा रक्षक यांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे करावे.

११) खाजगी सुरक्षा रक्षक गार्डसची चारित्र्य पडताळणी ५ दिवसात करून मिळेल

१२) पुणे पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात येणा-या चारित्र्य पडताळणी सर्टिफिकेटवर प्रत्येक व्यक्तीकरीता बार कोड दिलेला आहे. सदर बार कोडबाबत काही शंका असल्यास आपण नमूद बार कोड बाबत खात्री करू शकता .

वरील प्रमाणे सर्व अधिकारी यांनी बैठकीमध्ये खाजगी सुरक्षा रक्षक एजन्सी मालक चालक यांना मार्गदर्शन केलेले आहे.

( अजित लकडे)
समन्वय अधिकारी,
पोलीस निरीक्षक,
खाजगी सुरक्षा रक्षक सहभाग कार्यप्रणाली







